दिनांक २४/०७/२०२३

प्रती,
प्रकल्प संचालक
स्मार्ट प्रकल्प (कृषि) पुणे.

विषय: कोकण विभाग, ठाणे येथील नोडल अधिकारी श्री. भीमाशंकर पाटील व MIS तज्ञ श्रीमती वाघमोडे यांच्या होत असलेल्या सतत च्या त्रासाबद्दल.

अर्जदार: **निसर्गा पवार** पर्यावरण तज्ञ कोकण विभाग ठाणे स्मार्ट प्रकल्प (कृषी)

महोदय,

मी निसर्गा गुणवंत पवार माझे शिक्षण बी.एस.स्सी. ॲग्रीकल्चर, एम.एस.स्सी. पर्यावरणशास्त्र (गोल्ड मेडलिस्ट)असुन मी दिनांक २९/१२/२०२२ रोजी विभागीय प्रकल्प अंमलबजावणी कक्ष ठाणे, येथे पर्यावरण तज्ञ या पदावर रुजू झाले. रुजू झाल्यापासून विभागीय प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प, ठाणे येथील संनियंत्रण, मूल्यमापन व MIS तज्ञ श्रीमती. वाघमोडे या सतत मानसिक त्रास देत आहेत सदर त्रासाबद्दल मी श्री. अभिजित कांबळे, पर्यावरण तज्ञ, पी.सी. एम.यू., पुणे तसेच प्रकल्प संचालक आत्मा मा. श्री. दशरथ तांभाळे यांना वैयक्तिक तक्रार केलेली आहे तक्रारी खूप आहेत पण श्री. अर्जुन वाघमोडे तसेच श्री. अजय पाटील यांना देखील सांगून झाले आहे त्यानंतर आमची तक्रार करते असे म्हणून माझा त्रास अजून १० पटीने वाढला आहे. परंतु अधिकाऱ्यांची मानसिकता बदललेली नाही तसेच तक्रारीची दखल घेतलेली नाही. होणारा त्रास तसेच सहकर्यांसमोर होणारे मानसिक खच्चिकरण हे माझ्यासारख्या सुशिक्षित तरुणांना सहन न होणारा आहे.

होत असलेला त्रास-

१. कार्यालयात सार्वजनिक रित्या मानसिक खाच्चिकरण होणे.

२. रजेचा अर्ज फक्त माझ्याकडून च घेणे आणि रजा ही फक्त माझी च टाकने

३. Leave (रजा) टाकल्यानंतर मस्टर वर गैरहजर अशा पद्धतीची स्वतः च्या हाताने नोंद करणे. संबंधी विचारणा केली असता आम्हाला जे काही करायचे असेल ते आम्ही करू तुम्ही आम्हाला शिकऊ नका.

४. १२ जुलै- पर्यावरण व सामाजिक विषयक परिपत्रक मेल वर प्राप्त झाले होते, दोघं ही परिपत्रक भीमाशंकर पाटील ह्यांनी पाहिले सामाजिक तज्ञ  ला फाईल ला लावा व योग्य कारवाई करा असे सांगितले व मला परिपत्रक briefing करायला सांगितले.

५. १२ जुलै रोजी पर्यावरण तज्ञ ह्यांची मीटिंग झाली त्या मीटिंग च देखील briefing माझ्याकडे मागण्यात आले.

६. १३ जुलै रोजी TNM ह्या Consultany कडून PPA ची प्रत मागविण्यात आली होती दर महिन्या प्रमाणे मी नोडल अधिकारी ह्यांना PPA ची कॉपी द्या फोटो काढून TnM ला पाठवायची आहे असं सांगितलं तर ते त्यावर मला म्हणाले

मी देणार नाही, आणि पाहिजेच असेल तर सोमवार मंगळवारी वाघमोडे मॅडम आल्यानंतर त्यांना विचारा त्या म्हणतील तसे च होईल.

७. पगार कपात होईल असे शेरे मस्टर वर नमूद करणे मुद्दा क्र. ३ नुसार व त्यामुळे माझा पगार माहे जून कपात देखील करण्यात आला आहे

८. रीतसर रजे वर असून देखील मस्टर वर अनुपस्थित लिहणे

९. आरे कारे ची भाषा वापरणे, वाघमोडे मॅडम नाव घेऊन कधीच बोलत नाही ये पोरी हे काम कर ही भाषा वापरत असतात.

१०. ठाण्यात रूम करून राहण्यासाठी माझ्या मागे लागणे.

११. शासकीय कामकाजाविषयी काही विचारणा करायला गेली असता नोडल अधिकारी खूप तुच्छतेने बोलतात.

१२. ऑफिस वेळेत मी रोज वेळेवर जाते पण एखादी वेळेला जर गाडी उशिराने गेली तर मला लगेच बोलतात तुम्हाला आम्ही म्यानेग करणार नाही,बाकी मूल १२ ल जरी आलेत तरी त्यांना कुणी काही बोलत नाही किंवा सक्ती ही केली जात नाही लवकर येण्याची.

१३. आम्हाला आमच्या हक्काचे पैसे TA/DA दिला जात नाही त्यावर आम्हाला घोषवारा मागवला जातो जो की कंत्राटी कर्मचारी साठी नाहीये,प्रशासकीय अधिकारी वाघमोडे सर यांच्याशी झालेल्या १३ मार्च च्या मीटिंग मध्ये त्यांनी आम्हाला सांगितलं होत की तुम्हाला कुठल्याही प्रकारची टूर डायरी द्यायची नाही,तुम्ही फक्त tnm ह्यांनी दिलेली टूर डायरी च जमा करायची आणि बिल घ्यायचं हे असा असून देखील आमचे बिल मंजूर करत नाही.

सर, मला दिलेली इतर सर्व कामे व्यवस्थित करून देखील अतिशय घाण दर्जाची वागणूक कार्यालयात दिली जात आहे.

तुम्ही ह्या विषयावर योग्य ती कार्यवाही कराल ही अपेक्षा.

धन्यवाद.